संक्षिप्त खटला नं. १२९५७/२०२६
सरकार विरुध्द रोहित
नि. क्र.

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २८६ अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख.**

श्री. एस. बी. पाटील, न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मोटार वाहन न्यायालय, पुणे यांचे न्यायालयात.

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | :– २३.१२.२०२५ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | :– २३.१२.२०२५ |
| ३. | फिर्याददाराचे नांव, | :– महाराष्ट्र सरकार तर्फे<br>प्रभारी अधिकारी चिखली वा.वि. |
| ४. | आरोपीचे नांव, | :– रोहित शैलेश पुरी<br>रा. संथाजी नगर देहुगाव, ता. हवेली जि. पुणे. |
| ५(अ ) | अपराधाचा तपशिल. | :– |

आपण दिनांक २३.१२.२०२५ रोजी १६ः३० वाजण्याच्या सुमारास ज्योतीबा नगर चौक, पुणे तुम्ही तुमच्या ताब्यातील ॲटोरिक्षा क्र. एम.एच.–१४–एल.एस.–४२७३ या वाहनात प्रादेशीक परिवहन अधिकारी यांनी दिलेल्या अटी व शर्तींचा भंग करुन अवैध वाहतुक करतांना मिळुन आला व त्यायोगे तुम्ही मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम ६६ (१) सह कलम १९२ (अ) प्रमाणे गुन्हा केल्याची तोहमत आहे व सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

**६. आरोपीचे प्रतिकथन :–**

प्र.क्र.१ :– तुम्हाला पोलिस पेपर्सची नक्कल मिळाली काय ?
उत्तर :– होय.

प्र.क्र.२ :– तुम्हाला तुमचेवर ठेवणेत आलेला दोषारोप वाचून दाखविला तो तुम्हांला समजला काय ?
उत्तर :– होय.

प्र.क्र.३ :– तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर :– नाही.

प्र.क्र.४ :– गुन्हा कबुल केल्यास तुम्हाला द्रव्यदंडाची किंवा कारावासाची शिक्षा होऊ शकते तरीही तुम्ही स्वखुषीने गुन्हा कबुल करणार आहात काय ?
उत्तर :–

... ... ... ...
आरोपीची सही

न्यायदंडाधिकारी वर्ग–१,
मोटार वाहन न्यायालय, पुणे.

## न्यायनिर्णय

आरोपी न्यायालयासमोर हजर झाला. त्याचेविरुध्द लावण्यात आलेल्या आरोपांचा तपशिल नोंदवुन त्याचे प्रतिकथन नोंदविले असता त्याने स्वखुषीने गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. तसेच गुन्हा कबुल करतांना त्याचेविरुध्द कुठल्याही प्रकारचा दबाव किंवा प्रलोभन नसल्याचे त्याने सांगितले. आरोपीस गुन्हा कबुल केल्यास शिक्षा होऊ शकते याची जाणीव करुन दिली. तरीही त्याने गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. यावरुन आरोपीची कबुली स्वखुषीने आहे असे दिसुन येते.

२. आरोपीला शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रस्तुतचा त्याचा गुन्हा पहिलाच असुन अनावधानाने सदरचा गुन्हा घडल्याचे व त्याची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे असे सांगितले. त्यामुळे कमीत कमी दंड करावा अशी त्याने विनंती केली. आरोपीच्याविरुध्द लावण्यात आलेला आरोप आणि त्याची आर्थिक परिस्थिती याचा सारासार विचार करता त्याला द्रव्यदंडाची शिक्षा करणे न्यायोचित होईल या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## :- आदेश -:

१. आरोपी रोहित शैलेश पुरी याला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २८६ प्रमाणे मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम ६६ (१) सह कलम १९२ (अ) अन्वये गुन्ह्यासाठी दोषी धरुन रक्कम रु. १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार फक्त) इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे, द्रव्यदंड न भरल्यास १० दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

दिनांक- ०५.०५.२०२६

(एस. बी. पाटील),
न्यायदंडाधिकारी वर्ग-१,
मोटार वाहन न्यायालय, पुणे.

Fine of Rs. 10000/- PD
Paid on - 5 MAY 2026
Vide R. No. 218666

Sr. Clerk
J.M.F.C.(M.V.)
Pune.

- 5 MAY 2026